सर्वोत्कृष्ट संस्थेसाठी कॉमनवेल्थ ऑफ लर्निंगच्या आंतरराष्ट्रीय गुणवत्ता पुरस्काराने सन्मानित

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

ज्ञानगंगा घरोघरी

ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक - ४२२ २२२ * दूरध्वनी: कार्यालय (०२५३) २२३१७१६
फॅक्स: (०२५३) २२३०४७० * मो: ९४२२२४७२११
ई-मेल: dir_dsw@ycmou.digitaluniversity.ac

डॉ. माधवी धारणकर
प्रमुख, विद्यार्थी कल्याण व बहि:शाल शिक्षण सेवा केंद्र

जा.क्र. : विककें/२०१५/330
दिनांक : ३१.०७.२०१५

प्रति: मा. कुलसचिव
मुंबई विद्यापीठ एम जी
रोड, फोर्ट, मुंबई,
400 032

**विषय: शिक्षण महर्षी पंजाबराव देशमुख पुरस्कारासाठी व्यक्तीचे नामनिर्देशन पाठविणेबाबत.**

महोदय,

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक तर्फे दरवर्षी शिक्षणमहर्षी पंजाबराव देशमुख स्मृती पुरस्कार प्रदान करण्यात येतो. या पुरस्काराचे स्वरुप रु २१,०००/- रोख रक्कम, स्मृतीचिन्ह व सन्मामपत्र असे आहे.

हा पुरस्कार पारंपारीक शिक्षणाच्या क्षेत्रात महत्वपुर्ण काम करणाऱ्या संस्थेस किंवा व्यक्तीस आळीपाळीने दिला जातो. सन २०१४ मध्ये हा पुरस्कार संस्थेला दिल्याने या वर्षी हा पुरस्कार व्यक्तीस द्यावयाचा आहे. पुरस्कार निवडीसाठी खालील निकष निश्चित केलेले आहेत.

०१ हा पुरस्कार पारंपारिक शिक्षणाच्या क्षेत्रात भरीव काम करणाऱ्या व्यक्तीला देण्यात येईल. सदर व्यक्तीने केलेला शैक्षणिक विकास व त्यातील सातत्य महत्वपुर्ण असावे.
०२ वैचारिक लेखन, संशोधन, प्रकल्प, प्रयोग, कृती इ. तसेच संस्था किंवा चळवळीद्वारे केलेले लोकशिक्षणाचे कार्य ह्याचा विचार पुरस्कारासाठी केला जाईल.
०३ यापूर्वी सदर पुरस्कार मिळालेल्या व्यक्तीचा नव्याने पुरस्कारासाठी विचार केला जाणार नाही.
०४ हा पुरस्कार मरणोत्तर दिला जात नाही.
०५ नामनिर्देशन केलेल्या व्यक्तीची सामाजिक प्रतिमा वादग्रस्त नसणे आवश्यक आहे.

कृपया वरील निकषांवर आधारित आपल्या विद्यापीठ कार्यक्षेत्रातील व्यक्तीचे नामनिर्देशन दिनांक १५.०९.२०१५ पर्यंत पाठवावे ही विनंती. म्हणजे तो पुरस्कार निवड समितीसमोर ठेवता येईल. नामनिर्देशन प्रपत्राचा नमुना सोबत जोडला आहे. या संदर्भात आपल्या काही शंका, प्रश्न असल्यास आपण dir_dsw@ycmou.digitaluniversity.ac या ई-मेलवर संपर्क साधु शकता.

Madhavi 03/08/2015
प्रमुख,
विद्यार्थी कल्याण व बहि:शाल शिक्षण सेवा केंद्र

UNIVERSITY OF MUMBAI
IS/ICD/ECD/2015
6 AUG 2015
22973

AR(APW)
07/08/15
P. A to R

प्रति,
**प्रमुख,**
विद्यार्थी कल्याण व बहि:शाल शिक्षण सेवा केंद्र,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन,
**नाशिक - ४२२ २२२.**

जा. क्र. :
दिनांक :

महोदय,

आपले दिनांक --/--/२०१५ चे पत्र मिळाले. त्यानुार शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति पुरस्कार विचारार्थ खालीलप्रमाणे नामनिर्देशन करीत आहे.

०१ व्यक्तीचे नाव : ______________________________
(आडनाव) (स्वत:चे नाव) (वडीलांचे/पतीचे नाव)

जन्मदिनांक : ______________ वय : ______ वर्षे ______ महिने

०२ पत्ता : ______________________________
______________ पिन कोड ______________

०३ दूरध्वनी क्रमांक ______________ मोबाईल क्रमांक ______________

ई-मेल ______________________________

०४ सध्या कार्यरत असण्याचे ठिकाण/निवृत्तीच्या वेळचे कार्यरत असण्याचे ठिकाण
(पद, संस्था, पत्ता) : ______________________________
______________________________
______________________________

०५ पारंपारिक शिक्षणासंदर्भात केलेले वैचारीक लेखन : ______________________________
______________________________
______________________________

०६ पारंपारिक शिक्षणासंदर्भात राबवलेले प्रकल्प : ______________________________
______________________________

०७ पारंपारिक शिक्षणासंदर्भात केलेले प्रयोग :

०८ पारंपारिक शिक्षणासंदर्भात संस्था किंवा चळवळीद्वारे केलेले लोकशिक्षणाचे कार्य :

०९ मिळालेले बहुमान :

(आवश्यक संदर्भात प्रमाणपत्रे / प्रशस्तीपत्रे / छायाचित्रे यांच्या प्रमाणीत छायाप्रती तसेच ध्वनीचित्रफिती कृपया जोडाव्यात. आवश्यक असल्यास तपशील स्वतंत्र कागदावर द्यावा.)

१० वर निर्देश केलेली व्यक्ती डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति पुरस्कारासाठी निर्धारित निकषानुसार विचारार्थ पात्र आहे म्हणून मी नामनिर्देशन करीत आहे.

दिनांक : स्वाक्षरी :

नाव :